# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट दि. २४/०६/२०२०

## सराईत गुन्हेगाराच्या गुन्हे शाखा, युनिट ५ ने आवळल्या मुसक्या, पैठण औरंगाबाद येथे विवाहितेस आत्महत्या करण्यास प्रवृत्त करुन होता फरार

मा. पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई सो यांनी गुन्हयातील पाहीजे व फरारी आरोपी पकडण्यासाठी गुन्हे शाखेस विशेष मोहीम राबविण्यास आदेशीत केले होते त्याप्रमाणे दि. २४/०६/२०२० रोजी गुन्हे शाखा युनीट ५ कडील पोलीस कर्मचारी तळेगाव पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असताना **पोलीस कर्मचारी किरनाळे व दत्तात्रय बनसुडे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम तळेगाव स्टेशनचे अलीकडील पेट्रोल पंपाजवळ येणार असुन त्याने पिवळया रंगाचा फुल टि शर्ट व निळे रंगाची जिन्स पॅन्ट घातली असुन तो औरंगाबाद ग्रामीण येथील पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं. १९/२०२० भादविक ३०६ या गुन्हयामध्ये पाहिजे आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर माहिती वपोनि श्री बाळकृष्ण सावंत यांना कळविली असता त्यांनी सुचना देवुन कारवाई करणेबाबत आदेशीत केले. लागलीच पोलीस कर्मचारी यांचे दोन टिम बनवुन पेट्रोल पंपाजवळ सापळा रचुन थांबलेले असताना वरील वर्णनाप्रमाणे इसम पेट्रोल पंपासमोर येवुन थांबला. त्याला पोलीसांची चाहुल लागताच तो पळ काढु लागला असता त्याला शिताफिने पकडुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **अशोक नाना महापुरे, वय २६ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा गोळेवाडी, आंबी ता मावळ जि पुणे मुळ रा मु.पो.पैठण, लक्ष्मीनगर औरंगाबाद** असे असल्याचे सांगितले. पोलीस अभिलेख पाहिला असता तो औरंगाबाद येथील सराईत गुन्हेगार असुन तो **पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं. १९/२०२० भादविक ३०६** या गुन्हयामध्ये पाहिजे असल्याचे समोर आले. आरोपी नामे अशोक नाना महापुरे याने पुढीलप्रमाणे गुन्हे यापुर्वी केले आहेत.

१. **एम.आय.डी.सी. पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं ९५/२०१३ भादविक ३७९, २८३, २०१**
२. **पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं १७६/२०१३ भादविक ३७९, ३५३, ३३२ व गौण खणिज कायदा क २१(१)**
३. **पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं १७७/२०१३ भादविक ३७९**
४. **पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं १७६/२०१४ भादविक ३५३, ३७९, ३३२, ३४**
५. **बिडकीन पोलीस स्टेशन गु.र.नं. ११००/२०१३ भादविक ३७९, १०९, ३४३, १८१**
६. **एम.आय.डी.सी. पैठण पोलीस स्टेशन गु.र.नं १६८/२०१४ भादविक ३७९, ३४**

आरोपी नामे अशोक नाना महापुरे यास पुढील तपासकामी पैठण पोलीसांचे ताब्यात रिपोर्टने देण्यात आले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उपआयुक्त गुन्हे मा. श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे मा. श्री राजाराम पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-५ चे पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व पोलीस कर्मचारी दत्तात्रय बनसुडे, धनराज किरनाळे, मयुर वाडकर, संदिप ठाकरे, गणेश मालुसरे, सावन राठोड, फारुक मुल्ला, ज्ञानेश्वर गाडेकर, धनंजय भोसले, स्वामीनाथ जाधव, भरत माने, नितीन बहिरट, राजकुमार इघारे, श्यामसुंदर गुट्टे, दयानंद खेडकर, गोपाळ ब्रम्हांदे, राजेंद्र कदम यांनी केली आहे.